अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १२ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


## दुचाकीचा अपघात; जखमी महिलेचा मृत्यू

**सोलापूर** : माकणी (ता.लोहारा) येथे दुचाकीच्या अपघातात जखमी झालेल्या काशीबाई सौदागर कांबळे (वय ७५ रा.माकणी) या सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी सकाळी मयत झाल्या.

त्या रविवारी सायंकाळी दुचाकीच्या पाठीमागे बसून करजगाव हे माकणी असा प्रवास करीत होत्या. माकणी गावाजवळ समोरून दुचाकी धडकल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना उमरगा येथे प्राथमिक उपचार करून अनिल (नातु) यांनी सोलापुरात दाखल केले होते. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.






# तुफान फटकेबाजी



## सोन्याचा चमचा तोंडात घेतलेल्यांना १५००ची किंमत कशी कळणार

## अरे शहाण्या... अर्थमंत्री मी आहे का तू...



**सोलापूर/प्रतिनिधी**

**सोलापूरच्या होम मैदानावर मंगळवारी सोलापूर जिल्ह्यातील नारी शक्तीची भली मोठी ताकत दिसून आली.निमित्त होते,मुख्यमंत्री लाडक्या बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्याचे. देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हा सोहळ पार पडला. त्याला महिलांची विलक्षण गर्दी होती. लाडक्या बहिणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून दोनही उपमुख्यमंत्री भारावून गेले.या उर्जेने त्यांच्यात आक्रमकपणा भिनला आणि दोघांनीही आपल्या भाषणात महाविकास आघाडीच्या नेत्यांसह त्यांच्या बगलबच्च्यांना जबरदस्त फटके लगावले. सोन्याचा चमचा घेवून जन्माला आलेल्या बहिणींना आमच्या गरीब भगिनींच्या १५०० रूपयांच्या ओवाळणीची किंमत कशी कळेल,अशा शब्दात फडणवीस यांनी खासदार प्रणिती शिंदे यांचे नाव न घेता लगावला तर अजितदादांनी ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना टोले लगावताना अरे शहाण्या अर्थमंत्री मी आहे का तू,अशा शब्दात ही योजना बंद पडणार म्हणणाऱ्यांना सणसणीत चपराक दिली.**

खासदार प्रणिती शिंदे यांनी सरकार १५०० रुपये देऊन बहिणींचे प्रेम विकत असल्याचा आरोप केला होता.फडणवीस यांनी भाषणाच्या सुरूवातीलाच आपला मोर्चा या मुद्याकडे वळवला. सोलापूरच्या आमच्या एका बहिणीने आमच्यावर पैशांची लाच देऊन बहिणींचे प्रेम विकत घेण्याचा आरोप केला. आईचे प्रेम, बहिणीचे प्रेम, मुलीचे प्रेम जगाच्या पाठीवर कुणाला विकत घेता आले का? प्रत्यक्ष ब्रह्मदेव उतरला तरी या प्रेमाचे मोल तो करू शकत नाही. तुमच्या घरी मुख्यमंत्री झाले, तुमच्या घरी नेते झाले. पण माझ्या बहिणी पूर्ण महिनाभर राबतात आणि महिन्याच्या शेवटी हिशेबाची जुळवणी करतात, तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, पैशांअभावी ठरवलेल्या काही ४ गोष्टी करता येणार नाहीत. त्या बहिणींना हे १५०० रुपये काय आहेत हे विचारा, सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेल्या आमच्या या बहिणीला या पैशांचे मोल कसे समजेल?असे म्हणत फडणवीस यांनी खा. शिंदे यांना टोला लगावला.

### विरोधकांचा घेतला समाचार

विरोधकांनी सरकार आल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत लाडकी बहीण योजना रद्द करण्याचा इशारा दिला. अरे वेड्यांनो, ज्यांच्यामागे एवढ्या बहिणी आहेत, त्यांचेच सरकार येणार आहे. तुमचे सरकारच येणार नाही. मग तुम्ही रद्द तरी काय करणार?, असे म्हणत फडणवीस यांनी विरोधकांचा समाचार घेतला. अजितदादांनी देखील तुफान फटकेबाजी केली. काँग्रेसच्या एका माजी मंत्र्याने म्हटले होते की मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद करू. पण, महिलांना पैसे मिळतात, हे त्यांना बघवतच नाही. उलट विरोधकच सत्तेत आले तर ही योजना बंद करून टाकतील. श्री विठ्ठलाच्या साक्षीने सांगतो आम्ही सत्तेत आलो की, पुढचे पाच वर्षे योजना सुरू राहील, त्यामुळेच तुम्ही विचार करा आणि त्यांना (महाविकास आघाडी) सत्तेत आणून योजना बंद पडायची की आम्हाला सत्तेत आणून योजना सुरु ठेवायची, असे भावनिक आवाहन त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील लाडक्या बहिणींना केले.

काही जण म्हणाले, पैसे खात्याातून काढून घेतील. अरे कुठला भाऊ ओवाळणी परत काढून घेतो का रे शहाण्यानो. महायुती सरकारने सुरू केलेल्या या सर्व योजना सुरु राहिल्या पाहिजे, ही आमची इच्छा आहे. आम्हाला काही जण म्हणाले की फक्त बहिणींना देता, भावांकडे लक्ष देत नाहीत. आम्ही त्याांच्याकडेही लक्ष दिलेय, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

### काँग्रेस नेत्यांवर टीकास्त्र

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आहे. शेतकऱ्यांना येत्या सहा महिन्यांत दिवसा वीज देण्याचा आमचा संकल्प आहे. बळिराजासाठी आम्ही ७.५ एचपी मोटारचे बिलं माफ केलं आहे.कोट्यवधी रुपयांचे वीजबिलं आम्ही माफ केले आहे. सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असताना वीज बिल माफी करू म्हणाले. एक बिल शून्य रुपयाचे दिलंही. मात्र, पुढच्या निवडणुकीत विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले आणि ते म्हणाले ही योजना सरकारला परवडणार नाही. त्यानंतर २००४ पासून पुन्हा एकदा बिलं द्यायला सुरुवात केली. उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस इथे आहेत, त्यांच्यासमोर सांगतो आम्ही दिलेली वीजबिलं माफी ही औटघटकेची नाही. आम्ही त्यांच्यासारखे नाही,अशा शब्दात अजितदादांनी काँग्रेस नेत्यांना चिमटा घेतला.

### अरे शहाण्या अर्थमंत्री, तू आहे का मी?

आम्ही एकदा योजना जाहीर केली की, मागे हटणारे नाही. सरकारकडे पैसे नाहीत, असेही काहीजण म्हणाले. अरे शहाण्या अर्थमंत्री तू आहे का मी?असा सवाल अजितदादांनी महाआघाडीला विचारला.

### मुख्यमंत्री का आले नाहीत

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मंगळवारच्या नियोजित सोहळ्यासाठी येणार होते परंतु त्यांचा दौरा रद्द झाला.या अगोदरही त्यांनी सोलापूरचा दौरा रद्द केला होता.यावेळीही न आल्याने सोहळ्याच्या ठिकाणी एकच चर्चा सुरू झाली.त्यावर फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले. कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री येणार होते. मात्र, त्यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया झाल्याने ते कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत,असे त्यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांच्या पैठणीचे अप्रूप...

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच लाडक्या बहिणींनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. उपस्थित महिलांनी दोघांवर फुले उधळली याशिवाय दोघांच्याही हातात राख्या बांधल्या. यावेळी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ओवाळणी म्हणून बहिणींना मुख्यमंत्र्यांनी पाठवलेल्या पैठणी भेट दिल्या.या पैठणीचे सोहळ्यात मोठे अप्रूप दिसून आले.

## श्यामनगर झोपडपट्टीत गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर/प्रतिनिधी**

मोदी परिसरातील शामानगर झोपडपट्टीत राहणाऱ्या संतोष सिद्धलिंग पगडेकर (वय ३५) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

संतोष पगडेकर याने घरासमोरील खिडकीच्या लोखंडी ग्रीलला पॅन्टच्या सहाय्याने गळफास घेतला होता. हा प्रकार सकाळी ७ वाजेच्या सुमारात उघडकीस आला. त्याला फासातूनच सोडवून शासकीय रुणालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार माढे पुढील तपास करीत आहेत

## नळदुर्ग येथे टमटमला मोटार धडकली; ५ जखमी

**सोलापूर** : सहाआसनी रिक्षातून नळदुर्ग ते तुळजापूरकडे जात असताना पाठीमागून मोटर धडकल्याने रिक्षा उलटून चार महिलासह ५ प्रवासी जखमी झाले. हा अपघात मंगळवारी दुपारच्या सुमारात घडला .त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोन महिलांची प्रकृती गंभीर आहे. सुज्ञान सोमनाथ माशाळे (वय ४०), सुमनवार दत्तात्रय आवळे (वय ४), सविता मल्लिनाथ आवळे (वय ३५ सर्व रा. चिवरी ता.तुळजापूर) आणि दोन अनोळखी महिला. अशी जखमींचे नावे आहेत. ते सर्वजण सहा आसनी रिक्षात बसून नळदुर्ग ते तुळजापूरच्या दिशेने निघाले होते. दुपारी बारा वाजेच्या सुमारास नळदुर्ग येथील नगर परिषदेचे जवळ पाठीमागून मोटार धडकल्याने रिक्षा उलटून हा अपघात घडला. अशी प्राथमिक नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

## ग्रामसेवकाला ७५० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले



**सोलापूर** : गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतून शेतात नेऊन टाकलेल्या गाळाचे शासनाकडून आलेले अनुदान देण्यासाठी शेतकऱ्याकडून ७५० रुपयाची लाच घेताना मोहोळ तालुक्यातील खवणी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सोमनाथ चांगदेव सोनवणे (वय ३६ रा.सौंदणे, तालुका मोहोळ) याला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या पोलिसांनी सोमवारी रात्री अटक केली.

या प्रकरणी खवणे येथील एका शेतकऱ्याने तक्रार केली होती. या शेतकऱ्याने शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतून पोखरापूर तलावातील गाळ स्वतः ट्रॅक्टर- टिपर लावून शेतात नेऊन पसरविला होता. अशाप्रकारे तलावातील गाळ नेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान मिळत आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांनी संबंधित शेतकऱ्याने नेलेल्या गाळाच्या खेपेप्रमाणे शासकीय अनुदान ग्रामपंचायतकडे पाठवले होते. अनुदानाची ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांला खवणी ग्रामपंचायतचे सोमनाथ सोनवणे याने ७५० रुपये लाचेची मागणी केली. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार केली.

लाचलुचपत प्रतिबंध खात्याचे उपाधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पोलीस नाईक संतोष नरोटे, पोलीस शिपाई गजानन किनगी व चालक श्याम सुरवसे यांच्या पथकाने ग्रामपंचायतीत जाऊन खातरजमा केली. संबंधित शेतकऱ्याकडून लाच घेताना ग्रामसेवक सोनवणे याला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या पोलिसांनी सोमवारी रात्री रंगेहात पकडले व रात्री उशिरापर्यंत मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## पोलीस असल्याची थाप मारून ४० ग्रॅम सोने पळवले

**पंढरपूर** : आम्ही पोलिस आहोत,शहर परिसरात चोऱ्यामाऱ्या होत आहेत. त्यामुळे अंगावरील दागिने काढून ठेवा . अशी थाप मारून दोघा भामट्याने एका इसमाच्या गळ्यातील १ लाख ६० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन पळवली. ही फसवणुकीची घटना सोमवारी दुपारच्या सुमारात पंढरपूर येथील गोविंदपुरा परिसरात घडली.

याप्रकरणी दत्तात्रय देवप्पा कांबळे (वय ६५ रा.गोविंदपुरा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोघा भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. कांबळे हे काल दुपारी अडीच वाजेच्या सुमारास पायी घराजवळ आले होते. त्यावेळी दुचाकीवरील दोघांनी त्यांना आवाज देऊन थांबविले.

## दारू पिण्यास पैसे न दिल्याने पत्नीचा खून

**सोलापूर** : दारू पिण्याकरिता पैसे न दिल्याच्या कारणावरून पतीने-पत्नीच्या डोक्यात दगड घालून जीवे ठार मारून खून केल्याप्रकरणी पतीविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजश्री तुळजाराम गुजराती (वय-२७, रा.अविनाश नगर, सुशील नगर जवळ, एमआयडीसी) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.

याप्रकरणी राजश्री यांचा भाऊ ख्वाजा भिमराव विटकर (वय-३४, रा.साईबाबा चौक) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादी वरून फिर्यादीचे भाऊजी तुळजाराम मनोहर गुजराती (वय-३३, रा.अविनाश नगर, सुशीलनगर जवळ, एमआयडीसी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.असे फिर्यादीत नमुद आहे. ही घटना ७ ऑक्टोंबर रोजी रात्री सव्वा दहा ते साडेदहाच्या दरम्यान अविनाश नगर, सुशील नगर जवळ डॉ.सदाफुले यांच्या दवाखाना शेजारी एमआयडीसी येथे घडली.

# काडादी, अभिजीत पाटलांची तुतारी फुंकण्याची तयारी

## गुलटेकडीच्या 'निसर्ग'मध्ये भाऊगर्दी

## महेश कोठे, संतोष पवार, मिनल साठेंनी दिल्या मुलाखती



अभिजीत पाटील



महेशअण्णा कोठे



धर्मराज काडादी



संतोष पवार



मिनल साठे

**सोलापूर/प्रतिनिधी**

विधानसभा निवडुकीसाठी महाआघाडीचे जागा वाटप अंतिम टप्प्यात असतानाच आता शरदचंद्र पवार राष्ट्रवादीपक्षाकडून इच्छुंकांच्या मुलाखती घेण्यात येत आहेत. मंगळवारी पक्षाकडून सोलापूर जिल्ह्यातील ११ मतदारसंघातील ५५ पेक्षा जास्त जणांनी मुलाखती दिल्या. यामध्ये खास करून सिध्देश्वर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी दक्षिण विधानसभेसाठी मुलाखत दिल्याने राजकीय वर्तुळात तर्क वितर्क सुरू झाले आहेत. याशिवाय महेश कोठे, अभिजित पाटील, मिनल साठी, उत्तम जानकर, संतोष पवार यांनीही मुलाखती दिल्या आहेत.

पुण्यातील गुलटेकडी येथील निसर्ग मंगल कार्यालयात राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून विविध मतदारसंघाच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरू आहेत. पक्षप्रमुख शरद पवार यांनी मुलाखती घेतल्या. यावेळी खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह पक्षाचे खासदार उपस्थित होते. मोहोळसाठी सर्वाधिक २२ जणांनी मुलाखती दिल्या तर माढा मतदारसंघासाठी दहा जणांनी मुलाखती दिल्या आहेत. तर शहर उत्तर, दक्षिण आणि अक्कलकोटसाठी प्रत्येकी एका इच्छकाने मुलाखती दिल्या आहेत.

● **मोहोळ मतदारसंघ** : संजय क्षीरसागर, राजू खरे, अभिजित ढोबळे, रमेश कदम, पवन गायकवाड, सुशीला आबुटे, हनुमंत सोनवणे, संजीव बागडे, शहाजी राऊत सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार सरवदे, राजेश गुजर यांच्यासह २२ जणांनी मुलाखती दिल्या. ● **माढा विधानसभा** : अभिजित पाटील, संजय कोकाटे, शिवाजी कांबळे, मिनल साठे, संजय पाटील घाटणेकर, बाळासाहेब पाटील, नितीन कापसे यांच्यासह १० जणांनी मुलाखती दिल्या. ● **मंगळवेढा-पंढरपूर** : भगिरथ भालके, सुभाष भोसले, साधना भोसले, नागेश भोसले, त्रिभुवन धाईंजे, संदीप मांडवे. ● **माळशिरस** : उत्तम जानकर, त्रिभुवन धाईंजे, राजेश गुजर. ● **सांगोला** : जयमाला गायकवाड, बाबुराव गायकवाड ● **शहर मध्य** : तौफीक शेख, यु.एन. बेरिया, सुधीर खरटमल, प्रमोद गायकवाड ● **शहर दक्षिण** : धर्मराज काडादी, संतोष पवार ● **शहर उत्तर** : महेश कोठे ● **बार्शी** : विश्वास बारबोले ● **करमाळा** : नारायण पाटील, संतोष वारे. ● **अक्कलकोट** : महेश माने

### ज्यांची नावं चर्चेत, अनुपस्थित

माढा मतदारसंघातून आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांनी उमेदवारी मागितली आहे. मात्र ते या मुलाखतीसाठी पोचलेले नव्हते. तसेच मोहिते पाटील गटाकडून शिवतेजसिंह मोहिते पाटील हे निवडणूक लढविण्यास इच्छुक असताना तेही मुलाखतीसाठी तिथे हजर नसल्याचे समजते.


### या नावांची चर्चा जास्त

अभिजित पाटील यांनी याआधी अपक्ष निवडणूक लढविण्याचे घोषित केल्यानंतर पुन्हा शरद पवार गटाकडे उमेदवारीसाठी मुलाखत दिल्याने जोरदार चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे दक्षिणमधून धर्मराज काडादी काँग्रेसकडून इच्छुक होते, मात्र त्यांनीही राष्ट्रवादीकडून मुलाखत दिली. याशिवाय मिनल साठे या काँग्रेसच्या नगराध्यक्षा आहेत, त्यांनीही मुलाखत दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. भगिरथ भालकेही काँग्रेसकडून इच्छुक होते मात्र त्यांनीही राष्ट्रवादी पक्षाकडे मुलाखत दिली.

मुलाखती देणाऱ्यांमध्ये काँग्रेसमधील अनेक नेत्यांचाही समावेश आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लोण्याचा गोळा !!!

| कल्याण |
|---|
| 578-06-268 |

| मुंबई |
|---|
| 188-75-799 |